# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०-०४-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक २० एप्रिल २०१७ रोजी (का.प.क्र. ३८) मा.महापौर श्री. भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-४० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया, आयएएस नगर सचिव, श्री डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २१. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २२. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २३. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २४. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २५. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |

| | |
|---|---|
| २६. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २७. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २८. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २९. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३०. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३१. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३३. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३६. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३७. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ३८. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ३९. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४०. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४१. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४२. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४३. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४४. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४५. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ४६. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ४७. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४८. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४९. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५०. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५१. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५२. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५३. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५४. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ५५. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५६. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५७. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५८. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |

| | |
|---|---|
| ५९. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६०. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६१. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६२. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६३. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६४. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६५. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६६. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६७. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ६८. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ६९. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७०. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७१. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७२. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७३. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७४. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७५. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७६. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७७. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७८. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७९. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८०. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८१. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८२. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ८३. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८४. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८५. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८६. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ८७. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८८. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८९. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९०. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९१. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

| ९२. | स.स.कु.जमादार सायली भागवत |
|---|---|

**नामनिर्देशित पालिका  सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील पाणी प्रश्न गंभीर आहे. विशेष सभा आयोजित करण्यासदंर्भात सभागृह नेता यांनी पत्र देऊन विनंती केली होती. सभा आयोजित केली नाही. स्थायी समितीच्या सदस्यांनी मागणी केल्यानंतर सभा बोलविता येते किंवा नाही नियमात काय आहे? खुलासा व्हावा.

श्री.अफसर खान :वार्डात पाणी मिळत नाही. साडेतील चार फुट पाण्याची लेव्हल येते. वार्डातील लोक दररोज सकाळी स.सदस्याच्या घरी येतात. माझ्या वार्डात दोन ठिकाणी घाण पाणी येते. अनेकदा कळविले कार्यवाही केली नाही.

श्री.प्रमोद राठोड :पाणी विषयावर चर्चा घ्यावी.

मा.महापौर :स्थायी समितीच्या सदस्यांनी मागणी केल्यानुसार किती दिवसात सभा आयोजित करायला पाहिजे? नियमात काय आहे? सचिव खुलासा करतील.

नगरसचिव :प्रकरण २ मधील ‘ड’ नुसार महापौर किवा वर सांगितल्यानुसार उपमहापौर त्यास योग्य वाटेल तेव्हा विशेष सभा बोलविता येईल आणि त्यांनी पालिका सदस्यांच्या एक चतुर्थांश किंवा स्थायी समितीच्या किमान ४ सदस्यांनी लेखी मागणी केल्यावर विशेष सभा बोलवली पाहिजे.

मा.महापौर :१५ तारखेला पत्र आले, आज २० तारीख आहे केंव्हा सभा लावणार आहे?

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वच भागात पाण्याचा प्रश्न आहे. भावना लक्षात घेता, विशेष सभा आयोजित करावी.

श्री.दिलीप थोरात :विशेष सभा समजून आजच पाणी प्रश्नी चर्चा करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पाणी प्रश्नावर चर्चा करावी. नंतर विषय घ्यावे.

मा.महापौर :पाणी प्रश्नावर चर्चा करावी.

श्रीमती मनीषा मुंढे :माझे वार्डात पिण्याच्या पाण्यामध्ये घाण पाणी येते. ५० लोक ॲडमीट आहे. स्वच्छ पाणी देण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती अंकिता विधाते :माझ्या वार्डात नवीन लाईन टाकली परंतु क्रॉस कनेक्शन दिले नाही. नागरीक आजही खराब पाणी पीत आहेत. दुसरे एका कामासाठी महापौर निधीतून लाईनचे काम होणार होते ती संचिका गहाळ झाली.

मा.आयुक्त :स.सदस्या श्रीमती मुंढे यांचे वार्डात दोन प्रश्न आहेत एक ड्रेनेज लाईन व दुसरा स्टॉल वॉटरचा आहे. स्टॉल वॉटर साठी नाल्याचे काम चालू आहे तेथे अतिक्रमण आहे. त्यानंतर पुढे ड्रेनेज लाईनमध्ये जोडायचे आहे. ते अतिक्रमण काढणारच आहे. युआयडीएसएसएमटीच्या माध्यमातून जे घरामध्ये ड्रेनेजचे पाणी जात आहे ते घरे न तोडता रस्त्याच्या कडेने लाईन देऊन रेल्वेलाईन पर्यत मिळवायची आहे.

श्री.प्रमोद राठोड :अनेकांनी स्टॉल वॉटरमध्ये ड्रेनेजचे पाणी सोडले. लाईन टाकण्या बरोबरच सोडत असलले पाणी पुढे घेऊन जाणे आहे. मोठ्या डायमीटरची लाईन टाकावी.

श्री.दिलीप थोरात :नाल्यावरील अतिक्रमण स्वत: ते मालक काढून घेण्यास तयार आहे. दोनच लोक आहे ते काढत नाही.

मा.आयुक्त :अतिक्रमण स्वत:हून काढून घेत असेल तर चांगली बाब आहे. उद्यापासूनच काम सुरु करता येईल.

मा.महापौर :लोक अतिक्रमण काढून घेण्यास तयार आहे. प्रशासनाला मदत करावी. उद्यापासून कामास सुरुवात करावी. ड्रेनजचे पाण्यामूळे दुर्गंधी झाली. ती बंद करावे.

श्रीमती मिना गायके :पाण्याच्या लाईनवर ड्रेनेज लाईन आहे. घाण पाणी पाण्याच्या लाईनमध्ये मिसळते लाईन बदलून द्यावी मागणी केली काम होत नाही.

कार्य.अभियता-श्री चहल :स्थळ पाहणी केली. टेंडर काढले आहे कोणी घेत नाही त्यामूळे उशीर होत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :तातडीचे काम समजून ६७(३) सी मध्ये करण्यात यावे.

कार्य, अभियंता :लेबर वर्कचे काम असेल तरच ६७(३) सी मध्ये काम करता येते. नवीन काम असेल तर टेडर काढूनच कार्यवाही करावी लागेल.

श्री.राजू शिंदे :सोयीनुसार ६७(३ )वापरत असेल तर योग्य नाही. ३ कोटीची ६७(३) मध्ये काम केली पाण्याचे टेंडर टँकरचे बील, पगाराचे रक्कम ६७-३ मध्ये दिली जाते. तर आवश्यक विकास कामासाठी ६७-३ सी का वापरला जात नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :चुकीची माहिती देत आहे. कोणत्याही तातडीचे काम समजून आयुक्ताची मंजूरी असेल तर असे काम करता येतात. तीन चार वार्डात घाण पाण्याचा प्रश्न आहे तो सोडवावा.

कार्य.अभियंता-श्री.चहल :मार्केट रेट डीआर पेक्षा जास्त आहे.

मा.महापौर :जे तातडीचे व आवश्यक कामे आहे जनतेच्या जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण होतो. अशी कामे ६७(३) सी मध्ये केली पाहिजे. सर्रास ६७-३ मध्येकामे करू नये.

श्री.नंदकुमार घोडेले :पाणीपुरवठयासाठी लागणारे पाईप व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासनाला आदेशीत करावे. संबंधीत कंपनीला चर्चेसाठी बोलवावे. सेल्फ डेव्हलपमेन्टच्या बीड बायपास रोडवरील वसाहतीना पाणी देण्याचे धोरण निश्चित केले त्या प्रमाणेच बीड बायपास रोडवरील कासलीवाल मार्व्हल या वसाहतीस सुध्दा तेथील नागरीकांच्या मागणीनुसार पिण्याचे पाणी देणे बाबत कार्यवाही करावी.

मा.महापौर :स.सदस्य यांची सुचना विचारात घ्यावी. स.श्रीमती गायके यांचे वार्डातील पाणी लाईनचे काम करण्यात यावे.

मा.आयुक्त :पाईप उपलब्ध असेल तर आवश्यकतेनुसार त्या-त्या वार्डात कामे करता येईल पाईपचे रेट वाढले आहे. जास्त दराच्या निविदा येत आहेत. कपंनीकडून पाईप मागवायचे तर ॲडव्हॉन्स द्यावे मागणी होत आहे.

श्री.नासेर सिध्दीकी :माझे वार्डात पाईप पडून आहे काम करावे.

| | |
|---|---|
| श्रीमती अंकिता विधाते | :माझे वार्डात लाईन टाकली. क्रॉस कनेक्शन केव्हा जोडणार आहे. |
| कार्य.अभि.श्री.चहल | :तेथे ड्रेनेज लाईनचे काम चालू होते. ते काम संपल्यानंतर क्रॉस कनेक्शन केले जाईल. |
| मा.आयुक्त | :जे जे लहान कामे राहिली आहे. तेथे गंभीरता निर्माण होईल, अशी कामे ६७-सी मध्ये करता येईल. |
| श्री.राजू शिंदे | :६७-३ मध्ये गुत्तेदार कामे घेत असेल तर टेंडर मधील काम का घेत नाही? |
| मा.आयुक्त | :हा प्रशासकीय भाग होत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जनतेला पाणी मिळावे ही आमची भावना आहे. तातडीने पाणीपुरवठ्याची कामे करावी. कशी कामे करायची प्रशासनाचा भाग आहे. |
| श्रीमती कमल नरोटे | :वार्डात ५-५ दिवस पाणी येत नाही आलेले पाणी घाण येते. तक्रारी दिल्या तरी घेत नाहीत. अधिकारी फोन उचलत नाही. |
| कार्य.अभि.श्री.चहल | :दुषित पाणी बंद केले जाईल. |
| श्रीमती ज्योती मोरे | :माझे वार्डात मल्हार चौक पर्यत रस्त्याच्या वसाहतींना १० मिनिट पाणी वाया जाते. २० वर्षापासून ती लाईन निकामी झाली. आयुक्तांना निवेदन दिले, पाईप नाही सांगतात. हे योग्य नाही. दररोज पाणी वाया जाते. नवीन लाईन टाकावी. |
| कार्य.अभि.श्री.चहल | :दहा वर्षापासूनचा हा प्रश्न आहे. स.सदस्य यांचे सोबत पाहणी करून अंदाजपत्रक करण्यात येईल. जुनी लाईन आहे. त्यावर सिमेन्ट रस्ता करण्यात आला. बाजूने नवीन लाईन करावीच लागेल. अंदाजपत्रक तयार करून एका आडवड्याच्या आत सादर होईल. |
| श्रीमती मनीषा मुंढे | :शिवाजी महाराज पुतळा ते गणपती मंदीर पर्यत पुर्ण लाईन खराब आहे नवीन लाईन टाकावी. |
| कार्य.अभियंता(पापू) | :मुख्य लाईनवर लोकांनी कनेक्शन घेतले. ब्रँच लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार केले, निविदा काढली आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही होईल. |
| श्रीमती पुष्पा रोजतकर | :यादवनगर भागात चार घरांना पाणी येत नाही. पाण्याला प्रेशर नाही. |
| कार्य.अभियंता | :उद्या स्थळ पाहणी केली जाईल. |
| श्रीमती समीना शेख | :पाणीपट्टी दर वाढ करू नये. ठराव घेतला त्याची अंमलबजावणी केली काय? पाणी पट्टी वाढी संदर्भात उपविधी मंजूर करण्यात आला होता तो निर्णय रद्द केला का ? |
| कार्य.अभियंता-पापू | :उपविधी मंजूर केले ते शासनाकडे पाठविले होते. त्यानुसार दरवर्षी १० टक्के पाणीपट्टी वाढ होते. समांतरचा ठेका घेणारी कंपनी रद्द झाली. समांतर योजना रद्द झाली नाही. त्यासाठी भविष्यात निधी लागणार आहे. |
| श्री.रेणुकादस वैद्य | :सभागृहाने पाणीपट्टी दर वाढ रद्दचा ठराव घेतला त्याची अंमलबजावणी केली का? |
| श्री.नंदकुमार घोडेले | :१० टक्के वाढीव पाणीपट्टी रद्द करण्यासाठी शासनाची मंजूरी लागेल असे सांगता, तर समांतर योजना या सभागृहाने रद्द केली त्यास शासनाची मंजूरी घेतली का? |
| कार्य.अभि.श्री.चहल | :पाणीपट्टी दरवाढ रद्द करावी. तसा ठराव या विभागास प्राप्त नाही. |
| श्री.दिलीप थोरात | :समांतर रद्द करण्याचा ठराव घेतला, तसाच पाणीपट्टी रद्द करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. |

श्री.नंदकुमार घोडेले :तसा ठराव घेण्यात यावा. आदेशीत करावे. मा.मुख्यमंत्री महोदय यांना सुध्दा मी पत्र दिले. त्याची प्रत मा.आयुक्तांना दिली आहे. किमान यापूढे १० टक्के वाढीव दराने पाणीपट्टीची नोटीस देण्याचे बंद करावे

श्री.कैलास गायकवाड :टँकरच्या दरातही १० टक्के वाढ केली ती रद्द करावी.

मा.महापौर :दहा मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ १२-४५ वा.पुन्हा १-०० वा.सभेला सुरूवात)

श्रीमती माधुरी देशमुख :वार्ड ८० मध्ये गुरूसाहनीनगर, पारीजातनगर भागात चमेली व चाफा इमारतीमध्ये, एन-४ ए-सेक्टर मध्ये १० घरांना पाणी येत नाही. मी पत्र दिले खोदकाम केले जाते काम होत नाही. टँकर देत नाही. ए-सेक्टर मध्ये घाण पाणी येते.

कार्य अभि.श्री.चहल :पारीजातनगर भागात लाइन टाकली. पाणी प्रमाणात मिळते असे नागरीकांनी सांगितले आहे. जेंव्हा मागणी होते तेंव्हा टँकर पाणीपुरवठा केलेला आहे. नवीन लाईन केल्यास व मेंन्टेनन्सचे काम केल्यास सुरवातीला घाण पाणी येतेच.

श्रीमती माधुरी देशमुख :वेळेवर पाणी देण्याची तसदी घ्यावी. सदस्यांना कळविण्यात यावे. वेळेवर व प्रेशरने पाणी आले नाही, तर हा विभाग जबाबदार राहिल. याची नोंद घ्यावी.

कार्य, कार्यकारी :वेळेवर व प्रेशरने पाणी येईल.

मा.महापौर :ज्या भागात पाणी प्रश्न निर्माण झाला तेथील दखल घ्यावी.

श्री.जफर शेख :इंदिरानगर बायजीपूरा किराडपूरा, रोषणगेट, बारी कॉलनी, संजयनगर भागात ९ दिवसाआड पाणी येते. काही वार्डात दोन चार दिवसाआड पाणी येते. वेदांतनगरला एक दिवसाआड पाणी येते. असे का होते?

श्रीमती समीना शेख :पाणीपट्टी वाढ रद्द का केली नाही?

श्री.जफर शेख :वार्डात पाण्याविषयी दुरूस्तीचे कामे होत नाही. पाणी येत नाही. जाणून बूजून आमच्यावर अन्याय का होत आहे? काही वेळा घाण पाणी येते.

श्री.नंदकुमार घोडेले :पाणीपट्टी १० टक्के वाढ केली. मागिल वर्षी ३७०० रू होती. तीच ठेवावी असा निर्णय मागिल बैठकीत घेतला. अडचण येत असेल तर शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवावा. सभागृहाने वाढ केली तरच वाढ होईल. नसता ३७०० रू. राहिल असे आदेशीत करावे.

कार्य.अभियंता :ठराव मिळाला तर शासनाकडे पाठविता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :टँकरची दरवाढ, पाणीपट्टीची दरवाढ ही रद्द करावी.तसा एकत्रित ठराव घ्यावा.

श्री.दिलीप थोरात :दरवाढ यापूढे होऊ नये तसा ठराव घेऊन शासनाकडे पाठवावा.

मा.आयुक्त :ज्यावेळी समांतर एजन्सीला काम दिले. त्यावेळी दरवाढ कशी होणार? नमूद होते शासनाकडे पाठविले शासनाचे निर्देशानुसार हे केले. सभागृहाची भावना लक्षात घेऊ. पंरतु एक लिटर पाणी घेणेसाठी ११ पैसे खर्च होतो. नागरीकांना तेच पाणी पुरविण्यासाठी ६० पैसे खर्च येतो. सभेची मान्यता झाली, तर तसा शासनास पाठवू. सध्या जुन्या रेट प्रमाणे पैसे भरले तरी मान्य करणार आहे.

श्री.प्रमोद राठोड :टँकरची दरवाढ केली ती मागिल वर्षीप्रमाणे असावी.

मा.आयुक्त :वार्ड ६० मध्ये जो प्रश्न असेल त्यासाठी टिम पाठविली जाईल. ९ दिवसानंतर का पाणी येते? याची माहिती घेतली जाईल.

श्री.जहागीर खान :पाणीपट्टी पुर्ण घेतो पाणी त्या प्रमाणात मिळत नाही. एक महिन्यात किती दिवस पाणी देता? जुन्या शहरात पाणी कमी का येते?

श्री.रामेश्वर भादवे :समांतर एजन्सीकडे काहींनी पाणी कर भरणा केला. त्याचे रेकॉर्ड मनपाकडे नाही.

मा.महापौर :रेकॉर्ड अपडेट ठेवावे. पाणीपट्टी भरणा करून घेण्याची व्यवस्था करावी. ज्यांनी पाणीपट्टी भरणा केली. त्यांचेकडून डबल कर वसुल करू नये.

मा.आयुक्त :कन्झ्युमंर नंबर समांतर कडे होते. आता मालमत्ता कर भरतेवेळीच त्याच नंबरवर पाणीपट्टी भरून घ्यावी. असे निर्देश दिले. कन्झ्युमर नंबर पण ॲड करणार आहे.

श्रीमती सरवत बेगम :नागरीकांना पाणी देणे. ही मनपाची नैतिक जबाबदारी आहे. शहांगज टाकीवरून २२ वार्डास पाणी पुरवठा होतो. ४-४, ६-६ दिवसाआड पाणी येते. काही भागात २ दिवसा आड पाणी असा फरक का?

श्री.जफर शेख :वेदांतनगर भागात १ दिवसाआड पाणी जुन्या शहरात आमच्या वार्डासह काही वार्डात आठ दिवसाआड पाणी असे का होते? नियोजन करावे. पाणीपुरवठा सुरळीत करावा. वेळेवर पाणी मिळावे.

कार्य.अभियंता-(पापू) :शटडाऊन करण्यात आले होते. त्यामूळे पुरवठा विस्कळीत झाला. तीन दिवसाआड पाणी दिले जाईल.

श्री.फिरोज खान :संजयनगरची टाकीमध्ये घाण साचलेली आहे. तेच पाणी पिण्यासाठी दिले जाते हे योग्य नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:वार्डातील टाकी भरली जात नाही. नियोजन केले जावे. उन्हाळ्याचे दिवस आहे.

या वेळी कार्य.अभियंता श्री. चहल यांना स.सदस्या घेराव घालून पाणी प्रश्नाबाबत प्रश्न विचारतात.

श्री.गंगाधर ढगे :श्री.चहल यांचेकडील पाणीपुरवठ्याचा चाार्ज काढावा. त्यांना जायकवाडी ते शहरापर्यंत येणारी समांतर जलवाहिनीचे काम द्यावे.

श्रीमती सिमा खरात :सिडको-हडको भागात रेग्यूलर सोडण्यात येणारे पाण्यामध्ये आठवड्यातून एक दिवस वाढीव गॅप दिला जातो. फोन केला तर उचलत नाही. श्री.चहल हे चांगले काम करीत नाही त्यांचेकडून पा.पुरवठयाचा चार्ज काढावा.

मा.आयुक्त :पाणीपुरवठा वर्क लोडचे काम श्री.चहल पाहतात तसेच इतर कामासाठी बाकी अभियंते काम करतात. आता दोन भाग केले.तसेच २५ ते २८ तारखेला प्रत्येक वार्ड समिती निहाय रस्ते पाणी व ड्रेनेजच्या कामासाठी बैठक घेणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जायकवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यतच्या समांतरचे काम श्री.चहल यांचेकडे द्यावे व शहरातील पाणीपुरवठ्याचे काम दोन जे ई कडे सोपवावा. नागरीकांचे प्रश्नाची जान असणारे अधिकारी पाणीपुरवठयासाठी नेमावे.

मा.महापौर :पाणीप्रश्न गंभीर आहे. वेळेवर पाणी न येणे खराब पाणी येणे, जास्तीचा गॅप देणे फोन न घेणे ही बाब गंभीर आहे. श्री.चहल यांना जायकवाडी ते शहरापर्यत जास्तीत जास्त पाणी कसे आणता येईल ते काम दयावे व शहरातील पा.पुवठयासाठी दोन भाग करून अधिकारी नेमावे.

| | |
|---|---|
| श्रीमती स्मिता घोंगरे | :सेल्फ डेंव्हलपमेन्ट सोसायटीचे अनेक कामे चालू आहे.त्यांना पाणी देऊ शकतो का , एखादया ठिकाणी पाणी देण्याची मागणी केल्यास लाईन टाकता येत नाही पाणी नाही अशी कारणे दिली जातात. |
| कार्य.अभियंता | :पाहणी करून माहिती दिली जाईल. |
| श्री.राजू शिंदे | :शहरात पाणी टंचाई आहे असे असतांना एखादी सेल्फ डेव्हलपमेंन्टची स्कीम चालू आहे तेथील नागरीकांना पाणी पुरवठा करू शकतो का ? |
| मा.आयुक्त | :जर लेआऊट झालेला असेल तर त्या हद्दीपर्यत लाईन देता येईल. बांधकामासाठी पाणी देता येणार नाही. |
| श्री.राजू शिंदे | :स.सदस्या यांनी पत्रव्यवहार केला तेथे आजही बांधकाम चालू आहे. तरीही नळ कनेक्शन दिले गेले. सातारा देवळाई भाग मनपात आला त्यांना पाणी देत नाही नवीन वसाहती जेथे सेल्फ डेव्हलपमेंन्ट होते तेथे पाणी का देता. एका ठिकाणी २७-८-१४ परवानगी मागीतली परंतु तेंव्हा पाणी नाही म्हणून परवानगी दिली नाही त्यांनी पुन्हा दिं. २०-१-१७ ,२२-१-१७ अर्ज दिला ५-३-१७ ला परवानगी दिली. |
| मा.आयुक्त | :जर इमारत बांधकाम परवानगी असेल तर नळ कनेक्शन देणेस हरकत नाही. वर्षाच्या शेवटी १०० मीटर लाईन टाकली ती नवीनच आहे. |
| श्री.राजू शिंदे | :जुन्या वार्डात टाकली असेल सेल्फ डेव्हलपमेंन्ट मध्ये नाही.जुनी काढून टाकली असेल.ती नवीन भागात टाकली असा अर्थ होत नाही. |
| मा.महापौर | :वार्डातील घरांना पाणी नाही. बिल्डरांनी घरे बांधली त्यांना पाणी दिले जाते.असे का होते असे मा.उपमहापौर यांचे म्हणणे आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पाणीपुरवठयात मॅन पावर कमी आहे नळ कनेक्शन लिगल करून देण्यास कुणी नाही. अनेक नागरीकांना चकरा माराव्या लागतात.रेग्युलाईज होत नाही म्हणून इलिगल कनेक्शन घेत आहे. जे ई नाही उपअभियंता नाही.जायकवाडी पासून पाणी आणण्याची व्यवस्था करावी. टेंडर कुणी घेत नाही. विकास थांबलेला आहे पाणीपुरवठयात जे ई दयावे. |
| श्री.राजू शिंदे | :जुन्या वसाहती आहे त्यांना १०० टक्के पाणी दयावे त्यानंतर नवीन वसाहतीना पाणी दयावे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :ज्यांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केला त्यांना पाणी दयावे.तेथील रस्ते व इतर सुविधा होणे अपेक्षीत आहे. |
| श्री.मनोज गांगवे | :जालना रोडचे चिकलठाणा पर्यत कनेक्शन चेक करावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :कर्मचारी यांनी टॅंकर घोटाळा केला या बाबत चर्चा केली होती चौकशी अहवाल देणार होते काय झाले. |
| श्रीमती स्मिता घोगरे | :वार्डातील वसाहतीत १०-१५ वर्षापासून घरे आहे त्याना पाणी देत नाही.बिल्डरांनी विकसीत केलेल्या योजनेला लगेच पाणी दिले जाते. |
| मा.आयुक्त | :परवानगी दिली तेथे पाणी दिले पाहिजे.गुंठेवारीमध्ये सुध्दा काही ठिकाणी पाणी दिले आहे. |
| श्री.राजू शिंदे | :१३५ एमएलडी पाणी येते ते शहराला पुरत नाही तरी सेल्प डेव्हलपमेंन्ट साठी पाणी देतो हे योग्य नाही. |

श्री.रेणुका दास वैद्य :गुंठेवारीत लाईन टाकली असेल तरी पुरवठयावर परीणाम नाही कारण लाबूंन पाणी आणण्या ऐवजी त्या नागरीकांना जवळ पाणी मिळत आहे.

श्रीमती संगिता वाघुले :गेल्या वीस वर्षापासून आरतीनगर भागात पाणी लाईन नाही.

श्रीमती चक्रनारायण सीमा:एका व्यक्तीच्या घरी एक इंचीचे दोन कनेक्शन दिले असे करता येते का?

श्री.शोभा बुंराडे :वार्डातील लोक कर भरतात त्यांना पाणी देत नाही. काही वेळा घाण पाणी येते.

श्री.अय्युब जागीरदार :पोटतिडकीने स.सदस्य यांनी पाणी प्रश्नावर चर्चा मांडली पाणीपुरवठयाच्या कामासाठी विशेष अधिकारी म्हणून ज्यांना बोलविले ते श्री.चहल हे प्रश्न सोडवू शकत नाही प्रश्नाचे उत्तर देऊ शकले नाही. जे २५ वर्षापासून या विभागात काम करतात त्यांना पाणीपुरवठयाचे कामासाठी दयावे. पाणी प्रश्न मोठा आहे रात्री ३ ते ४ वाजता नागरीक आम्हाला फोन करून रस्त्यावर थांबवून विचारणा करतात हे योग्य नाही. चिकलठाणा भागात काही लोकांनी इल्लिगल कनेक्शन घेऊन शेतीसाठी पाणी वापरतात. श्री.चहल यांच्या जोडीला आणखी अधिकारी दयावे. माझ्या वार्डात जुनी सिमेंन्ट लाईन आहे ती बदलावी. घाण पाणी येत आहे. तीन महिन्यापासून खड्डा करून ठेवला काम होत नाही.

श्रीमती सायरा बानो :दिल्लीगेट येथे पंप हाऊस आहे तेथे १०० एच.पी.चा पंप लावावा जे की जुन्या शहरासाठी काही वार्डाना जास्तीचे पाणी देता येईल पुढील महिन्यात पवित्र रमझान सन येत आहे या काळात नागरीकांना पाण्याची कमी पडू नये. नियोजन करावे. काही भागात ४,५,९ दिवसाआड पाणी तर काही भागात एक दिवसा आड पाणी येते या बाबत नियोजन असावे व सर्वांना समान पाणी मिळेल याची दखल घ्यावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :एन-५ च्या टाकीवरुन दोन महिन्यात दिपाली हॉटेल ते चिकलठाणा भागापर्यत पुरेसे पाणी आले नाही. दोन टप्पे झाले की पाण्याची लेव्हल कमी होते. पाणी येत नाही लोक आमच्याकडे येतात. माझ्या वार्डात सुरवातीला १५ मिनीट दुषीत पाणी येते शहरात विधंन विहिरी आहे. तेथील दुरूस्तीचे कामे केल्यास १०,५ टक्के पाणीप्रश्न सुटेल.

श्रीमती मनीषा लोंखडे :वार्डात जुनी लाईन होती नवीन क्रॉस कनेक्शन केले नाही.एका ठिकाणी जुनी लाईन आहे ती बदलावी पाण्याचे टप्पे वाढवून दयावे

श्रीमती ज्योती मोरे :वार्डात जय दुर्गा हौसींग सोसायटी ३४ वर्षापासून कर भरतात पाणी व इतर सुविधा देत नाही. भुषणनगर भागात दुषित पाणी येते.

श्री.सुभाष शेजवळ :वार्डातील टाकीची दुरूस्ती करावी नवीन लाईन टाकावी. इलिगल नळ कट करावे.पाणीप्रश्न मोठा झालेला आहे समस्या सोडावी.

श्रीमती समीना शेख :नहर ए अंबरचे पाणी घ्यावे शहरात अनेक भागात विहिरी आहे विधंन विहिरी आहे ते पाणी घ्यावे. संजय नगर येथे टाकी मोडकळीत आलेली आहे दुरूस्ती करावी. त्यासाठी बजेटमध्ये तरतुद करावी.

श्री.सचीन खैरे :हनुमान टेकडीची टाकी पुर्ण भरली जात नाही. किमान चार मीटर टाकी भरली जावी. तरच तेथील नागीरकांना पुरेसे पाणी मिळेल.

श्रीमती ज्योती अंभग :सहा वसाहतीमध्ये पाणी दिले जात नाही त्या लोकांनी बेटरमेन्ट चार्जेस भरलेले आहे.वार्डात टाकीची दुरूस्ती करावी.

कु.सायली जमादार :समांतर कडे सातारा देवळाई चे काम दिले होते,कंपनीने काय काम केले. आता मनपाने कायमस्वरूपी पाण्यासाठी काय नियोजन केले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाण्याचे नियोजन करावे. साईनगर भागात पाण्याच्या लाईनला मोठी गळती दुरूस्तीचे काम होत नाही. ती लाईन बदलावी. घाण पाणी येते. नागरीकाच्या तक्रारी आमच्या पर्यत येतात. नियोजन करावे.

श्री.गजानन मनगटे :मागिल वर्षी जायकवाडीत कमी पाणी असूनही समांतर एजन्सीने पाणी सोडण्यामध्ये गॅप दिले नाही. एक दिवसाआड पाणी दिले होते. समांतरचा निर्णय घेतला तेंव्हा महापालिका पुर्णपणे पुरवठा करेल असे आयुक्तांनी सभागृहात म्हटले होते. कार्य.अभियंता श्री.चहल हे लक्ष देत नाही. जायकवाडी ते फारोळा पर्यत जास्तीत जास्त पाणी आणावे. ड्रेनेज लाईनचे पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये जात आहे. पाण्याचे लाईनचे डीएसआर रेट जास्त असेल तर ड्रेनेज लाईनचे काम करावे. ठेकेदार काम करण्यास तयार आहे. शुन्य नियोजन आहे. माझ्या वार्डात पाणी कमी प्रमाणात मिळते मनपाकडे पाणी पुरवठा आल्यापासून ५० टक्के लोकांना पाणी मिळत नाही. प्रेशरने पाणी येत नाही.टाकी भरत नाही दुषीत पाणी येते. मेंन्टनंन्सचे टेंडर काढले कोणीही घेत नाही.**श्री.चहल यांची बदली करावी व पाणीपुरवठयाचे नियोजनासाठी योग्य निर्णय घेण्यात यावा.**

श्री.कैलास गायकवाड :वार्ड ५९, ६० ११३ व सिडको हडको भागातील दुषीत पाणी संदर्भात तक्रारी दिल्या माझ्या वार्डात देवगिरी हिल्स भागात एक दीड वर्षापासून पाणी येत नाही. क्रॉस कनेक्शन करीत नाही सहा महिणे झाले. २०-२५ पत्र दिले कार्यवाही केली नाही.वार्ड ६० मध्ये सुध्दा एमजीएमच्या बाजूने मुख्य लाईन मध्ये ड्रेनेज पाणी मिक्स होते. इंदिरानगर उत्तर-दक्षिण भागातील २०-२५ गल्ल्यामध्ये दुषित पाणी येते. अनेकदा सांगितले कार्यवाही होत नाही. पाणी प्रश्न सुटेल असे आदेशीत करावे.

श्री.विकास एडके :समांतरचा ठेका रद्द करतांना प्रशासन पाणीपुरवठया बाबत सर्व नियोजन करणार होते. का नियोजन केले नाही.

मा.महापौर :उन्हाळा सुरू झाला आता पाण्याची मागणी वाढलेली आहे. सर्व नागरीकांना पाण्याची टंचाई जाणवत आहे. अनेकदा सुचना करून सुध्दा प्रशासनाने सुधारणा केली नाही. यापुर्वी पाणीपुरवठा सुरळीत होत होता त्यांचे प्रशासनाने आत्मपरीक्षण करावे त्याप्रमाणे नियोजन करावे. अशीच परीस्थिती राहिली तर विशेष सभा आयोजित केली जाईल. ज्या सुचना प्रश्न सदस्यांनी मांडले ते सोडवावे. शहरातील सर्व पाणीपुरवठा सुरळीत करावा. सभा अर्धातासासाठी तहकूब करण्यात येते (वेळ दु.२-४५ वाजता सभा ३-३० वा.सुरू)

**विषय क्रमांक ९६३:-**

सोमवार दिनांक २७.०२.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३६) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री.नंदकुमार घोडेले :मालमत्ता कराची वर्षभर वसुली करावी व तीन ३-३ महिन्याची डिमांड नोटीस देऊन वसुली करावी.

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

सोमवार दिनांक २७.०२.२०१७ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-३६) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास तसेच मालमत्ता कराची वसुली स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार वर्षभर नियमीतपणे करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ९६४:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.कैलास गायकवाड :भारतनगर भागातील वैयक्तिक शौचालयासाठी अनेक लोकांनी अर्ज दिले १०० लोक असे असतील त्यांना हे शौचालय देऊ शकतो.सर्वे करावा सर्वांना लाभ मिळेल याची दखल घ्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :किरकोळ कारणामूळे काहीचे वैयक्तिक शौचालय नामंजूर केले पुन्हा सर्वे करून कार्यवाही करावी. शिथीलता दयावी लाभ दयावा.यासाठी ३ हजार मनपा वाढीव रक्कम देणार आहे.सामाजिक संस्थांना हे काम करण्यास तयार आहे अर्धवट शौचालय असतील ते दुरूस्तीसाठी निधी दयावा.यासाठी वेगळी वर्गवारी करावी सीएसआरच्या माध्यमातून ही करावे.१०० टक्के हगणदारी मुक्त होऊ शकेल.

मा.आयुक्त :७ हजारचे टारगेट होते ३१ मार्चपर्यत पुर्ण झाले नाही फक्त ४११२ वै.शौचालय झाले. प्राप्त अर्ज ७ हजार आहे.१५ मे पर्यत सीटी ओडीएफ करणार असे शासनाला हमी दिली.कळविले आहे. जो लाभार्थी असेल त्यांनी साधा अर्ज दिला तरी त्यांना याचा लाभ देणार आहे. ही प्रोसेस चालूच राहणार आहे. ज्यांनी अर्ज दिले नाही तरी त्यांनाही समावून घेणार आहे.१७ हजार टॉयलेट करायचे तर त्यासाठी पुर्ण पैसे मिळणार आहे. ज्यांचे नादुरूस्ती टॉयलेट आहे त्यांनाही समावेश करू परतु ज्यांचेकडे टॉयलेटच नाही त्यांना अगोदर प्राधान्य देऊ शहर ओडीएफ झाले की नाही यासाठी राज्य व केंद्र शासन कमेटी पाहणी करील त्याप्रमाणे प्रमाणपत्र मिळेल.सीएसआरच्या माध्यमातून काही एजन्सीला विनंती केली होती क्रिडाई संस्थेने मुकूंदवाडी राजनगर भागात काही शौचालये सुरू केली ७० टॉयलेट झाले तीन ते चार पब्लीक टॉयलेट लाईफ प्रा. ने घेतले आयसीआयसीआय व एचडीएफसी बँकही सहभागी होत आहे. मनपाने ३५ टॉयलेट बांधलेले आहे जे की त्यातील काही नादुरूस्त आहे. यासाठी काही एजन्सीला संस्थेला सहभागी करून घेऊन हे चांगले टॉयलेट करणार आहे राहिलेले मनपाच्या फंडातून केले जातील.कम्युनिटी टॉयलेटही बांधणार आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :शहरात मनपाने बांधलेले २४ शौचालय आहे सध्या त्याची वाईट अवस्था आहे.तेथे पाण्याची व्यवस्था करावी .२० टॉयलेट दुरूस्त करण्याची गरज आहे.क्रांतीनगर येथील टॉयलेटची वाईट अवस्था आहे.पाण्याचे कनेक्शन तेथे दयावे.

मा.आयुक्त :मनपाने यापुर्वी ३५ टॉयलेट बांधलेले आहे परीस्थिती त्यांची चांगली नाही एजन्सीच्या माध्यमातून मनपाच्या फंडातून काम करून घेणार आहे.

श्रीमती समीना शेख :महिलासाठी काही शौचालय राखीव असावे.मा.न्यायालयाचे पण निर्देश आहे.

मा.आयुक्त :१४ पैकी ५ टॉयलेट महिलासाठी आहे.३५ टॉयलेटमध्ये महिलासाठी सेप्रेट व्यवस्था असेल.

श्री.सचिन खैरे :क्रांतीचौक येथे अनेक वेळा मोर्चे अंदोलने तेथून निघतात येथेही पब्लीक टॉयलेट असावे.

श्री.रामेश्वर भादवे :माझ्या वार्डातील तीन टॉयलेटचे दुरूस्तीची कामाची संचिका प्रलंबीत आहे ती मंजूर करावे.

श्री.मनोज गांगवे :माझ्या वार्डात अनेक नागरीकाचे वै.शौचालय नादुरूस्त असून अर्धवट अवस्थेत आहे त्याचा वापर होत नाही अशा लोकांना सुध्दा सामावेश या योजनेत करावा पब्लीक टॉयलेटसाठी माझ्या वार्डात एअरपोर्ट च्या बाजूला पंपहाऊसची रिकामी जागा आहे ती निश्चित करावी सिडको चे काही ओपन जागा आहेत त्या घ्याव्यात.तेथे पब्लीक टॉयलेट करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एन-५ येथील टॉकीजच्या परीसरात पब्लीक टॉयलेट असावे.आजूबाजूच्या परीसर हा कमर्शियल आहे तेथील लोकांना टॉयलेटची व्यवस्था नाही तसेच माझ्या वार्डात काही लोकांकडून ५०० जमा करून या योजनेत घेतो असे सांगून पैसे जमा करीत आहे याची चौकशी करावी.

श्री.गजानन बारवाल :पदमपुरा भागात शौचालयासाठी काहींनी डिमांड केली सर्वे केला स्लम भागात एकाच इमारतीमध्ये ३-४ भाऊ एकत्रित २-२ रूम मध्ये राहतात सर्वासाठी एकच टॉयलेट असते. तेथे सर्वेच्या वेळी टॉयलेट आहे म्हणून देण्यास नाकारले.मोहनसींग मेहरा यांनी तक्रार देऊन सुध्दा टॉयलेट दिले नाही.याची दखल घ्यावी.प्रत्येक कुटूबासाठी एक टॉयलेट असावे.

मा.आयुक्त :उघडण्यावर जात असेल तर त्यांना १०० टक्के लाभ दिला जाईल.

कु.सायली जमादार :सातारा भागातील टॉयलेट बाबत २३२ संचिका तयार केल्या त्या लोकांनी फॉर्म भरणा केले वस्ती इलिगल आहे म्हणून देता येत नाही असे सांगण्यात आले.पब्लीक टॉयलेट सुध्दा करावे.

मा.आयुक्त :इलिगल वस्ती असेल तरी देता येते पब्लीक टॉयलेट साठी शासनाचे पैसे नाही वै.शौचालयासाठी शासनाचा पैसा आहे.

मा.महापौर :इलिगल वस्ती आहे तेथे टॉयलेट देता येत नाही हे योग्य नाही. प्रशासनाने अशा वस्तीसाठीही टॉयलेट देता येईल तशी कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :बेगमपूरा भागात पब्लीक टॉयलेटचे उदघाटन केले ती जागा खाजगी मालकीची आहे.मा.कोर्टात प्रकरण चालू आहे.स्टे आल्यानंतर एनओसी दिली गेली.हे योग्य नाही.

मा.आयुक्त :त्या बाजूला कुठे जागा असेल तेथे कार्यवाही करू

श्री.नंदकुमार घोडेले :स्वच्छ भारत अभियांन चालू आहे. केंद्र शासनाचे पथक पाहणीसाठी आले होते त्यांनी काय अहवाल दिला आहे.

मा.आयुक्त :हे गोपनिय असते केंद्र शासनाकडे अहवाल देतात.

श्री.नंदकुमार घोडेले :स्वच्छतेसाठी काही मशीनरी आलेले आहे पावसाळया आधी स्वच्छ करावे.यांत्रिकी विभागाकडे हे काम दयावे.संतसृष्टीची जागा स्वच्छ करावी.

मा.आयुक्त :खुल्या जागा स्वच्छ करायला पाहिजे परतु पहिले नाल्याची साफसफाईवर भर दयावा लागेल.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :पब्लीक टॉयलेटचे पाच ठिकाणी उद्‌घाटन केले होते बेंगमपूरा येथील पब्लीक टॉयलेटचे ही उद्‌घाटन केले चार कामे सुरू केली ऑलरेडी जयराज पांडे यांनी कागदपत्र दिले त्यांची बेंगमपूरा येथे जागा आहे.नंतर कळाले की पांडे यांचे नाव पीआर कार्डवरून निघाले आहे. ईएसआय ला विनंती केली की हे पब्लीक टायलेट आहे. सुविधा म्हणून वापर करतो आहे.

मा.महापौर :ज्या ठिकाणी काम सुरू केले संस्थेच्या माध्यमातून असेल मनपाकडून असेल त्यांचा पाठपुरावा करून तातडीने करून घ्यावे हा विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या घेतलेल्या आढाव्यास तसेच सुरू असलेले सार्वजनिक/वैयक्तिक शौचालयाचे काम तातडीने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६५:-** **(कार्यकारी अभियंता ४,५,६,७ व ९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५, नारेगाव अंतर्गत पटेल नगर, अजीज नगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेल नगर व कलावती नगर येथे ३०० मी.मी.व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग या विभागाच्या सन २०१५-२०१६ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९८,८९,१९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा ५०% खर्च शासनाच्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपलब्ध सोई-सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त अनुदानातून व ५०% खर्च महानगरपालिकेच्या हिश्याच्या रक्कमेतून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक १८.०३.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तरी, वॉर्ड क्र.३५, नारेगाव अंतर्गत पटेल नगर, अजीज नगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेल नगर व कलावती नगर येथे ३०० मी.मी.व्यासाची SWG ड्रेनेजलाईन टाकणे या कामाचा र.रु.९८,८९,१९५/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.नंदकुमार घोडेले :किती निधी दरवर्षी शासनाचा येतो.किती कामे दरवर्षी होतात.

कार्य.अभियंतात्र(श्री.सिकदर अली):५ कोटी या वर्षी निधी आलेला आहे.या प्रस्तावानुसार शासनाचा ५० टक्के निधी राहिल.उर्वरीत रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

श्री.दिलीप थोरात :याच वार्डाला निधी कसा दिला गेला. कोणाचे अधिकार आहे. सर्व सांगावे.

कार्य.अभियंता :यासाठी संबधीत विभागाकडे कमेटी आहे ती कमेटी निर्णय घेते.

मा.महापौर :विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५, नारेगाव अंतर्गत पटेल नगर, अजीज नगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेल नगर व कलावती नगर येथे ३०० मी.मी.व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकणे या कामाच्या र.रु.९८,८९,१९५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्याच्या काळात औरंगाबाद शहरात खेळाची मैदाने कमी आहेत. तसेच मैदानी खेळ नसल्याने आणि मुलांमध्ये मोबाईल गेम खेळण्याची प्रवृत्ती जास्त असल्यामुळे

तसेच व्यायामाची सवय नसल्याने मुलांची शारिरीक क्षमता कमी होत चालली आहे. त्यामुळे मुलांमध्ये कमी वयात विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे.

मुलांची शारिरिक क्षमता वाढविणे व व्यायामाची आवड निर्माण होणे यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत मानधन तत्वावर योग शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-** श्रीमती मिना रामदास गायके

श्री.कैलास गायकवाड :प्रस्ताव चांगला आहे. सर्वच ठिकाणी शिक्षक देणे हा खर्च मोठा आहे. त्यासाठी सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हे योगा शिक्षण दयावे. अशा संस्थेला आवाहन करावे.

श्री.गजानन बारवाल :पताजंलीचे ब-याच ठिकाणी योग शिबीर चालू असते. पताजंलीचे श्री. मिलीदंजी शुक्ला यांचेशी संपर्क साधला तर त्यांचे मार्फत योग शिक्षण या वियार्थ्याना देऊ शकतात.

मा.महापौर :ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचे अभिनंदन, योगाचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी अनेक सामाजिक संस्था काम करीत आहे.काही संस्थाचे लोक येऊन गेले त्यांनी म्हटले की विना शुल्क विदयार्थी, स.सदस्य, अधिकारी वर्ग यांना योगा शिक्षण देण्यास तयार आहे.तरी मानधनावर शिक्षकाची नियुक्ती न करता ज्या संस्था विनाशुल्क शिक्षण देण्यास तयार आहे त्या संस्थेकडून हे प्रशिक्षण घेण्यात यावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुलांची शारिरिक क्षमता वाढविणे व व्यायामाची आवड निर्माण होणे यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेत योगा शिक्षण घेण्यासाठी मानधनावर योगा शिक्षकाची नियुक्ती न करता सेवाभावी/सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विनाशुल्क योगा शिक्षण घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ईटखेडा, वॉर्ड क्र.१०७ हा स्लम असून सदर भागात दलित वसाहत आहे. दलित वसाहती मध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असून, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.१०७ मधील खालील कामांचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| ०१. | हमिदीया गार्डन येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०२. | हमिदीया गार्डन येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०३. | हमिदीया पार्क येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०४. | हमिदीया पार्क येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०५. | नाथनगर, ईटखेडा येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०६. | नाथनगर, ईटखेडा येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०७. | ईटखेडा स्लम भागात विविध ठिकाणी विद्युत पथदिवे बसविणे | १० लाख |

करीता, वरील प्रमाणे निधीचा प्रस्ताव तयार करून मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-** श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी : हमेदिया गार्डन येथे दलित वस्ती आहेत का ?

श्री.गजानन बारवाल : किती प्रस्ताव पाठविले व कोणते मंजूर झाले कोणत्या वार्डातील आहे.

कार्य.अभियंता-श्री.सिकदंर अली: दलित वस्तीमध्ये २१.९० कोटीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले आहे त्यापैकी १३.५० कोटीचे प्रस्ताव मंजूर आहे.

श्रीमती ज्योती नाडे : माझे वार्डातही दलित वस्ती प्रस्ताव मंजूर करून पाठविले होते ते का मंजूर झाले नाही.

कार्य.अभियंता : प्रस्ताव मंजूर करून जिल्हाधिकारी कडे पाठविले जातात.तेथे कमेटी आहे ते निर्णय घेतात. त्यानुसार कार्यवाही होते.

श्री.अब्दुल नाईकवाडी : हमेदिया गार्डन हे दलित वस्ती आहे का ?ती दलित वस्ती आहे पाहणी केली जाते का?

कार्य.अभियंता : हमिदिया कॉलनीमध्ये एक गार्डन आहे ते नाव आहे आजूबाजला दलित वस्ती आहे.५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती आहे प्रमाणपत्र असते त्यानुसार पाठविले जाते.

श्री.दिलीप थोरात : मा.पालकमंत्री महोदय व मा.जिल्हाधिकारी यांना विनंती करावी की मनपाचे आलेले प्रस्ताव व एकूण येणारा निधी हा प्रत्येक वार्डासाठी समसमान देण्यासाठी कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येतो. जे जे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रलंबीत आहे त्यास मान्यता घ्यावी.समसमान न्याय हक्क देण्याची विनंती करावी.प्रस्ताव पाठवितांना तशी विनंती पत्र दयावे. प्रस्ताव मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ईटखेडा, वॉर्ड क्र.१०७ मध्ये खालील कामांसाठी निधी मिळणे करीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| ०१. | हमिदीया गार्डन येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०२. | हमिदीया गार्डन येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०३. | हमिदीया पार्क येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०४. | हमिदीया पार्क येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०५. | नाथनगर, ईटखेडा येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे | १० लाख |
| ०६. | नाथनगर, ईटखेडा येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे | १० लाख |
| ०७. | ईटखेडा स्लम भागात विविध ठिकाणी विद्युत पथदिवे बसविणे | १० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४, शहाबाजार अंतर्गत दलित वस्ती घोषीत असल्यामुळे शासनाने दलित वस्तीचा दर्जा उच्च करण्यासाठी आवश्यकतेनुसार वॉर्डात विकासाचे काम करण्या करीता निधीची आवश्यकता आहे. र.रु.५० लक्ष.

दलित वस्ती

१. त्रिवेणी नगर येथे संरक्षीत भिंती बांधणे व कॉंक्रेटींग करणे
२. अशोक नगर येथे नाल्याची संरक्षीत भिंत बांधणे व पुल दुरुस्ती करणे, कॉंक्रेटींग करणे,
३. पोल सहित लाईट बसविणे,
४. भोईवाडा येथे ड्रेनेज लाईन बदलणे,
५. वॉर्ड मधील दोन स्मशानभुमी विकसीत करणे

दिलेल्या ठिकाणी विकासाची कामे करण्यासाठी शासनाकडून निधी मिळण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी **अनुमोदक:-** श्रीमती साजेदा फारूखी सईद फारूखी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.२४, शहाबाजार अंतर्गत खालील विविध विकास कामांसाठी र.रु.५० लाखाचा निधी मिळणे करीता प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. त्रिवेणी नगर येथे संरक्षीत भिंती बांधणे व कॉंक्रेटींग करणे
२. अशोक नगर येथे नाल्याची संरक्षीत भिंत बांधणे व पुल दुरुस्ती करणे, कॉंक्रेटींग करणे,
३. पोल सहित लाईट बसविणे,
४. भोईवाडा येथे ड्रेनेज लाईन बदलणे,
५. वॉर्ड मधील दोन स्मशानभुमी विकसीत करणे

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०९, देवानगरी, प्रतापनगर मध्ये मुस्तफाबाद हा भाग महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून समाविष्ट आहे. परंतु आजतागत मुस्तफाबाद भागामध्ये पाणी पुरवठ्याची कुठलीही व्यवस्था महानगरपालिकेने केलेली नाही. सदरील भागातील नागरीकांचे पाण्यासाठी खुप हाल होतात, विशेष बाब म्हणजे सदरील भागातील नागरीक नियमित कर भरणा करतात. उन्हाळ्यात तर सदरील भागात खुप जास्त त्रास होतो. त्याअनुषंगाने प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे **अनुमोदक:-**श्री.जगताप कमलाकर शामराव

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०९, देवानगरी, प्रतापनगर मध्ये मुस्तफाबाद भागामध्ये महानगरपालिकेने पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ८९, चिकलठाणा जुने गांव आठवडी बाजार चिकलठाणा येथे स्मशानभूमी असुन या स्मशानभूमीला “शिव भोलेनाथ स्मशानभूमी चिकलठाणा” असे नाव देण्यात यावे अशी या परिसरातील नागरीकांची मागणी असून त्यामागणीचा विचार करता या ठिकाणी बांधण्यात आलेल्या कमानीवर “शिव भोलेनाथ स्मशानभूमी चिकलठाणा” असे नाव टाकण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-** श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ८९, चिकलठाणा जुने गांव आठवडी बाजार चिकलठाणा येथील स्मशानभूमीला “शिव भोलेनाथ स्मशानभूमी चिकलठाणा” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९७१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०९, देवानगरी, प्रतापनगर भागात येणाऱ्या गट नं.१,२,३ व ४ मुस्तफाबाद भागाचे नाव बदलुन स्वामी विवेकानंद नगर असे करावे अशी तेथील नागरीकांची मागणी आहे. तरी, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे

**अनुमोदक:-** श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ,श्री.जगताप कमलाकर शामराव

| | |
|---|---|
| श्री.जफर शेख | :ऑलरेडी मुस्तफाबाद नाव आहे ते बदण्याची गरज नाही.इतर दुस-या भागासाठी प्रस्तावातील नाव दयावे. |
| श्री.सय्यद मतीन | :नवीन कॉलनी असेल वार्ड असेल तर देण्यास हरकत नाही परंतु हे ऑलरेडी नाव आहे बदलू नये. |
| श्री.दिलीप थोरात | :मुस्तफाबाद मोठी वसाहत आहे त्यामध्ये एक कॉलनी आहे त्यास स्वामी विवेकानंद नाव देण्याचे सुचवायला पाहिजे होते.तशी दुरूस्ती करावी. |
| श्री.गंगाधर ढगे | :तसे असेल तर दुरूस्तीसह पुढील सभेत आणावे. |
| श्री.अब्दुल नाइकवाडी | :आहे तेच नाव ठेवावे नवीन वस्तीसाठी नाव दयावे.पुढील सभेत दुरूस्तीसह आणावे. |
| श्री.गजानन बारवाल | :बी ॲण्ड सीची ती वसाहत आहे अधिकारी कर्मचारी तेथे राहतात.त्यांची ती सोसायटी आहे. |
| मा.महापौर | :प्रस्तुत प्रस्तावा संदर्भात नामांतर कमिटी नियुक्त करावी. नामांतर कमिटीकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येतो. |

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्तावात नमुद केलेले नाव देण्यासंदर्भात नामांतर कमिटी नियुक्त करावी नामांतर कमिटीकडे हा प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**<u>विषय क्रमांक ९७२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०७, ईटखेडा येथे १००% अल्पसंख्याक नागरीक असलेल्या १) सारा कॉलनी, बीड बाय पास रोड, २) हमिदीया कॉलनी, बीड बायपास रोड या दोन वसाहतीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने गत २०-२५ वर्षापासून एकही मुलभूत सुविधा दिलेल्या नाहीत. या दोन्ही भागात जवळपास दिड ते दोन हजार नागरीक नागरी सुविधेपासून वंचित आहेत.

याकरीता माननीय राज्य शासनाकडुन अल्पसंख्याक बहुल नागरीकांच्या वसाहती करीता तो दरवर्षी विकास कामांसाठी निधी प्राप्त होतो त्यामधुन/त्या अंतर्गत सारा कॉलनी भागातील काँक्रीट रस्त्यासाठी रु.२०.०० लक्ष विद्युत पथदिवेसाठी रु.५.०० लक्ष एकुण रु.२५.०० लक्ष तसेच हमिदीया कॉलनी या वसाहतीतील काँक्रीट रस्त्यासाठी रु.२०.०० लक्ष व विद्युत पथदिव्यांसाठी रु.५.०० लक्ष एकुण रु.२५.०० लक्षची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले **अनुमोदक:-** श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१०७, ईटखेडा येथे शासनाकडुन अल्पसंख्याक बहुल नागरीकांच्या वसाहती करीता जो दरवर्षी विकास कामांसाठी निधी प्राप्त होतो त्यामधुन/त्या अंतर्गत सारा कॉलनी भागातील काँक्रीट रस्त्यासाठी रु.२०.०० लक्ष विद्युत पथदिवेसाठी रु.५.०० लक्ष एकुण

रु.२५.०० लक्ष तसेच हमिदीया कॉलनी या वसाहतीतील कॉंक्रीट रस्त्यासाठी रु.२०.०० लक्ष व विद्युत पथदिव्यांसाठी रु.५.०० लक्ष एकुण रु.२५.०० लक्षची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत टि.व्ही.सेंटर येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा आहे. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती आहे. त्याकरीता, शहरातील नागरीक मोठ्या संख्येने अभिवादन करण्याकरीता येत असतात.

तरी, सदर पुतळ्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याकरीता छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याची रंगरंगोटी करावी, पाण्याचे कारंजे दुरुस्त करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ **अनुमोदक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत टि.व्ही.सेंटर येथे छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची दुरुस्ती, रंगरंगोटी, पाण्याचे कारंजे दुरुस्त करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७९, न्यायनगर येथे १००% अल्पसंख्याक नागरीक असलेल्या हुसेन कॉलनी भागामध्ये गेल्या २० वर्षापासून महानगरपालिकेकडून कोणतेही विकास काम झालेले नाही. त्यामुळे जवळपास १८ गल्लीतील जवळपास ५००० ते ६००० नागरीक हे नागरी सुविधांपासून वंचित आहेत.

याकरीता, मा.राज्य शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहतीसाठी जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त होतो त्यामधून/त्याअंतर्गत हुसेन कॉलनी भागातील ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ५० लक्ष, विद्युत पथदिवेसाठी ३० लक्ष व पाण्याच्या लाईनसाठी २० लक्ष व कॉंक्रीटीकरण करण्यासाठी ३० लक्षची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठवणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-** श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७९, न्यायनगर येथे राज्य शासनाकडून अल्पसंख्यांक बहुल नागरीकांच्या वसाहतीसाठी जो दरवर्षी विकास कामासाठी निधी प्राप्त होतो त्यामधून/त्याअंतर्गत हुसेन कॉलनी भागातील ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ५० लक्ष, विद्युत पथदिवेसाठी ३० लक्ष व पाण्याच्या लाईनसाठी २० लक्ष व कॉंक्रीटीकरण करण्यासाठी ३० लक्षची तरतुद करण्यासाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठवणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ९७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर, म्हसोबानगर या वॉर्डात ६०% दलित लोकांची वस्ती असून या भागामध्ये विकास कामे पाहिजे त्या प्रमाणे झाली नाहीत. येथील

पाण्याचा प्रश्न, रस्त्याचा प्रश्न अतिशय गंभीर असून या भागाचा विकास करण्यासाठी शासनाच्या विशेष दलित वस्ती विकासासाठी ठेवलेल्या राखीव निधीतुन रुपये ६० लक्ष मंजुर करून प्रस्ताव शिफारस करून शासनाकडे पाठविणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.बन्सी ग्यानु जाधव **अनुमोदक:-** श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०२, भगतसिंगनगर, म्हसोबानगर मध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी र.रु.६० लक्षचा निधी मिळणे करीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०३, एकतानगर या भागात ७५% दलित लोकसंख्या असुन विशेष दलित वस्तीसाठी शासनाकडे विकास कामासाठी निधी उपलब्ध करून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे नांव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर अंतर्गत जलवाहिनी टाकणे. | रु.२५ लक्ष |

**सुचक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३, एकतानगर या भागात खालील दर्शविलेल्या कामाकरीता दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नांव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.२० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.०३, एकतानगर अंतर्गत जलवाहिनी टाकणे. | रु.२५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे तसेच जलनि:स्सारण वाहिनी बदलणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन २०१५-१६ च्या दरसुची नुसार र.रु.९७,००,६२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा ५०% खर्च शासनाच्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपलब्ध सोयी-सुविधांचा विकास योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानातून व ५०% खर्च महानगरपालिकेच्या हिश्याच्या रकमेतून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रक दिनांक २१.०३.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तरी, वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे तसेच जलनि:सारण वाहिनी बदलणे या कामाचे रक्कम रु.९७,००,६२०/- चे अंदाजपत्रक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, अशोकनगर, मसनतपुर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे तसेच जलनि:सारण वाहिनी बदलणे या कामाच्या रक्कम रु.९७,००,६२०/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.११२, शिवाजीनगर मधील भारतनगर, साईनगर येथे विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व सिमेंट कॉंक्रीट करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ९९,८७,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१५-२०१६ नुसार तयार करण्यात आलेले आहे या कामाचा खर्च "नागरी दलित वस्ती सुधार योजना" सन २०१६-२०१७ मधील प्राप्त अनुदाना मधून करण्यात येईल.

तरी, सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९९,८७,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११२ शिवाजीनगर मधील भारतनगर, साईनगर येथे शासनाच्या "नागरी दलित वस्ती सुधार योजना" अंतर्गत विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व सिमेंट कॉंक्रीट करणेच्या कामाच्या र.रु. ९९,८७,५००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पर्यावरण संवर्धन संदर्भात व प्रदूषण नियंत्रणा संबंधी समाजात जनजागृती करण्यासाठी दृश्य फलकांद्वारे संदेश देणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत शहरामधील प्रमुख ठिकाणी दृश्य फलक बसविणे/उभारणी करणे आहे. शहरामध्ये विविध वर्दळीची व प्रमुख ठिकाणे आहेत. सदर प्रमुख सार्वजनिक मोक्याच्या ठिकाणी, चौकामध्ये जसे की, बसस्थानक, रेल्वेस्थानक, शासकीय रुग्णालय, विविध शासकीय इमारती, दर्शनी भाग, पर्यटन स्थळे अशा प्रकारच्या सार्वजनिक ठिकाणी जवळपास २३१ फलक बसविण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकरणी विविध ठिकाणी लावण्यात येणाऱ्या दृश्य फलकांमुळे समाजामध्ये पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रणा संबंधी जनजागृती होण्यास मदत होईल.

या कामासाठी तयार करण्यात आलेले अ.प.रक्कम रु.१,३०,५०,०००/- इतकी आहे. त्यास अधीक्षक अभियंता सा.बां.खाते, औरंगाबाद यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामाकरीता निधी उपलब्ध होणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असता, जिल्हाधिकारी यांचे पत्र जा.क्र./जिवायो/नाविपू/२०१६-१७/५६७ दि.२९.०३.२०१७ अन्वये महानगरपालिकेस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

करीता, अ.प.र.रु.१,३०,५०,०००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पर्यावरण संवर्धन संदर्भात व प्रदूषण नियंत्रणा संबंधी समाजात जनजागृती करण्यासाठी दृश्य फलकांद्वारे संदेश देणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत शहरामधील प्रमुख ठिकाणी, विविध वर्दळीच्या ठिकाणी, सार्वजनिक मोक्याच्या ठिकाणी, चौकामध्ये जसे की, बसस्थानक, रेल्वेस्थानक, शासकीय रुग्णालय, विविध शासकीय इमारती, दर्शनी भाग, पर्यटन स्थळे अशा प्रकारच्या सार्वजनिक ठिकाणी जवळपास २३१ दृश्य फलक बसविणेच्या/उभारणेच्या कामाचे र.रु. १,३०,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र ६४, गुलमोहोर कॉलनी प्रभागात महानगरपालिकेचे संत तुकाराम नाट्यगृह आहे. दरवर्षी २१ व २२ एप्रिल रोजी गुलमोहोर कॉलनी प्रभागाअंतर्गत गुलमोहोर महोत्सव साजरा करण्यात येतो. या महोत्सवात राज्यस्तरीय तसेच राष्ट्रस्तरीय पुरस्कार विजेते तसेच राज्यस्तरीय तसेच राष्ट्रस्तरीय क्रिडा प्रतिनिधीत्व करणाऱ्या क्रिडापटूंचा गौरव करण्यात येतो. तसेच स्थानिक कलाकरांना एक मोठे व्यासपीठ या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येते. याच बरोबर सामाजिक बांधीलकीतून शासकीय कागदपत्रांचे मार्गदर्शन शिबीर यात घेण्यात येते. शहरातील सर्वानाच याचा लाभ होत असल्याने संत तुकाराम नाट्यगृह दरवर्षी या महोत्सवासाठी २१ व २२ एप्रिल रोजी पूर्ण दिवसांसाठी कायमस्वरुपी आरक्षीत ठेवण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे **अनुमोदक:-** श्री.मनोज बन्सीलाल गांगवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र ६४, गुलमोहोर कॉलनी प्रभागाअंतर्गत दरवर्षी २१ व २२ एप्रिल रोजी साजरा करण्यात येणाऱ्या गुलमोहोर महोत्सवासाठी या प्रभागाअंतर्गत असलेले महानगरपालिकेचे संत तुकाराम नाट्यगृह हे दरवर्षी म्हणजे २१ व २२ एप्रिल रोजी पूर्ण दिवसांसाठी कायमस्वरुपी आरक्षीत ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नगर विकास विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्र.अशस/ १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि.३१.०८.२००९ अन्वये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत अग्निशमन सेवांशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटीकरण करणे, अग्निशमन सेवेतील कार्यरत मनुष्यबळाचे सक्षमीकरण करणे, अग्निशमन वाहने उपलब्ध करून देणे तसेच औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये एकूण आठ अग्निशमन केंद्रे बांधणे इत्यादी बाबींची अंमलबजावणी करण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. सध्या एकूण आठ अग्निशमन केंद्रांपैकी तीन अग्निशमन केंद्र चालू असून उर्वरित पाच अग्निशमन केंद्र करीता पाच अग्निशमन वाहने, एक बोलेरो जीप आणि अग्निशमन विभाग प्रमुख यांचेसाठी एक स्कॉर्पिओ जीप असे एकूण सात वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४४२ दि.०७.०९.२०११ नुसार औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन दलाचे सक्षमीकरण करण्यासाठी शासन निर्णयानुसार पाच अग्निशमन केंद्र उभारणी आणि वाहन खरेदीचा एकुण खर्च र.रु.५.१० कोटी पैकी महाराष्ट्र शासन हिस्सा ३५ टक्के रु.१.७८.५०.०००/- प्राप्त असून आय.डी.बी.आय.बँक शाखा उस्मानपूरा येथील खात्यात जमा आहेत. महानगरपालिका औरंगाबाद हिस्सा ६५ टक्के खर्च रु.३,३१,५०,०००/- + अधिकारी/कर्मचाऱ्यांची नवनिर्मित २३२

पदांसाठीचा खर्च रु.३,६६,६८,५२०/- = रु.६,९८,१८,५२०/- (अक्षरी रुपये सहा कोटी अठ्ठ्यान्नव लाख अठरा हजार पाचशे वीस फक्त) या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे.

करीता, उपरोक्त प्रमाणे Water Tender X Type पाच नग रु.२,६६,८५,०००/-, एक स्कॉर्पिओ जीप रु.१०,२५,८७१/- आणि एक महिंद्रा बोलेरो जीप रु.६,४०,८७५/- असे एकूण सात वाहने खरेदी करण्यासाठी एकूण रक्कम रुपये २,८३,५१,७४६/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय दुरुस्तीसह मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, Water Tender X Type पाच नग रु.२,६६,८५,०००/-, एक स्कॉर्पिओ जीप रु.१०,२५,८७१/- (सदर वाहन उप आयुक्त प्रशासन तथा अग्निशमन विभाग प्रमुख यांच्यासाठी)आणि एक महिंद्रा बोलेरो जीप रु.६,४०,८७५/- असे एकूण सात वाहने खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये २,८३,५१,७४६/- च्या रक्कमेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९८२</u>:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा अंतर्गत मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा या शाळेच्या ५ खोल्यांचे बांधकाम करणे संदर्भात पुर्वीच्या ९ वर्ग खोल्यांचे बांधकाम व एक स्वच्छतागृह आहे. या वर्षापासून १० वीचा वर्ग सुरू होत असून बालवाडी ते १० वी पर्यंत एकूण १२ खोल्यांची आवश्यकता आहे. तसेच e-Learning कक्ष व Science Lab व संगणक कक्ष प्रत्येकी एक या प्रमाणे एकुण १५ वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे. करीता शाळा इमारतीच्या पहिल्या मजल्यात एकुण ५ वर्ग खोल्या त्वरीत बांधून देण्यात याव्यात.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा अंतर्गत असलेल्या महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा या शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर एकुण ५ खोल्यांचे बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९८३</u>:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८९ अंतर्गत मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेला निसर्गवाढीने १० वीच्या वर्गाला परवानगी मिळणे बाबत आपल्या आदेशानुसार सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात इ.९ वीचा वर्ग सुरू करण्यात आला होता. त्यातील ३७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन इ.१०वी मध्ये गेल्यामुळे निसर्गवाढीनुसार इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करून इ.१० वीच्या वर्गाला परवानगी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा अंतर्गत असलेल्या महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा या शाळेच्या इमारतीमध्ये इयत्ता १० वीचे वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर या वॉर्डात ६०% पेक्षा जास्त दलित लोकसंख्या आहे "शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने" अंतर्गत या प्रभागातील मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी र.रु.०१.०० कोटीचा निधी आवश्यक आहे.

करीता, वॉर्ड क्र.७५ बौध्दनगर, उत्तमनगर या वॉर्डात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी "शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने"अंतर्गत विविध विकास कामांसाठी र.रु.०१.०० कोटीचा (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) निधी उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५ बौध्दनगर, उत्तमनगर या वॉर्डात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी "शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने"अंतर्गत विविध विकास कामांसाठी र.रु.०१.०० कोटीचा (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी फक्त) निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या बायजीपुरा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी पशुवैद्यक हे पद मानधनावर भरण्याबाबत उमेदवारांची निवड करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. सदर पदासाठी दि.१२.०४.२०१६ रोजी थेट मुलाखतीद्वारे आलेल्या उमेदवारांमधून त्यांच्या प्राप्त शैक्षणिक अर्हता,पात्रता,अनुभव व मौखिक मुलाखतीमध्ये प्राप्त गुणानुसार प्रतिक्षा उमेदवार डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१६/१३१४, दि.०८.०८.२०१६ नुसार 'पशुवैद्यक' म्हणून रु.२५,०००/- प्रतिमाह मानधनावर ०६ महिन्यांकरिता अटी व शर्तीनुसार तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि, त्यांना ०६ महिन्यांकरिता देण्यात आलेले नियुक्तीचा कालावधी दिनांक ०७.०२.२०१७ रोजी संपलेला आहे. तथापि, सद्यस्थितीत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याबाबत मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी शिफारस केली आहे.

करीता, डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना पशुवैद्यक या पदावर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन अटी व शर्तीनुसार दिनांक ०९.०२.२०१७ पासुन पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे, पशुवैद्यक यांची सद्यस्थितीत सेवेची आवश्यकता असल्याबाबत केलेल्या शिफारसीनुसार डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना पशुवैद्यक या पदावर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन अटी व शर्तीनुसार दिनांक ०९.०२.२०१७ पासुन पुढील ०६ महिन्यांकरीता नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बालकल्याण समितीच्या वतीने महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी गुजरात राज्यात महिला व बालकल्याण समितीच्या निधीमधून अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा व या राज्यात महिला व बालकल्याण समिती मार्फत कोणकोणत्या योजना राबविण्यात येतात त्या बद्दलची माहिती स.सदस्यांना मिळावी व त्याचा फायदा शहरातील महिलांना व्हावा या उद्देशाने दौऱ्याचे आयोजन करण्यास व होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-** श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व बालकल्याण समितीच्या वतीने महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी गुजरात राज्यात महिला व बालकल्याण समितीच्या निधीमधून नियमाप्रमाणे अभ्यास दौरा करण्यास व या अभ्यास दौऱ्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८६/१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील विविध भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणेच्या कामासाठी खर्च करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-**श्री.रमेश भानुदास जायभाय

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील विविध भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे व ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणेच्या कामासाठी खर्च करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८६/२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील रस्त्याच्या कामासाठी खर्च करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.रमेश भानुदास जायभाय **अनुमोदक:-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील रस्त्याच्या कामासाठी खर्च करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९८६/३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील विविध भागात विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी खर्च करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदकः-** श्री.कचरु छगनराव घोडके

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर येथील विविध भागात विद्युत व्यवस्था करणेच्या कामासाठी महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९८६/४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर गल्ली क्रमांक ४, ५ येथील रस्त्याच्या कामासाठी खर्च करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.रमेश जायभाय **अनुमोदकः-** श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८६, प्रकाशनगर गल्ली क्रमांक ४, ५ येथील रस्त्याच्या कामासाठी महाराष्ट्र शासनातर्फे प्राप्त असलेल्या मुलभूत सेवा अनुदानामधून रुपये २५ लक्षचा निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
प्र.नगर सचिव
महानगरपालिका औरगाबाद